गाव तिथे प्रतिनिधी नेमणे आहे..

दैनिक यश सिध्दी न्यूजसाठी महाराष्ट्रासह सोलापूर जिल्ह्यात गावत तिथे प्रतिनिधी नेमणे आहे. अधिक माहितीसाठी संपर्क : ९९२१९८८३५८

दैनिक
# यश सिद्धि न्यूज

RNI NO. MAHMAR/2023/84162

YASH SIDDHI NEWS

● वर्ष २ रे ● अंक ९० वा ● रविवार १८ ऑगस्ट २०२४ ● पाने ४ ● किंमत ४ रु/-

| * Volume 2 | Issue 90 | Date : 18/08/2024 | blow Sunday |Page 4 Price 4

# ..तर दीड हजारांचे तीन हजार होतील

## लाडकी बहीण योजनेबाबत मुख्यमंत्री शिंदेंचं मोठं विधान

**दैनिक यश सिद्धी न्यूज**

मुंबई/वृत्तसंस्था : राज्य सरकारने काही दिवसांपूर्वी मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना जाहीर केली. या योजनेची सध्या मोठी चर्चा सुरु आहे. याच योजनेवरून सत्ताधारी आणि विरोधकांमध्ये आरोप-प्रत्यारोप सुरु आहेत. या योजनेच्या माध्यमातून पात्र महिलांना दर महिन्याला १५०० रुपये दिले जाणार आहेत, तर जुलै आणि ऑगस्ट या दोन महिन्यांचा या योजनेचा निधी महिलांच्या खात्यात जमा करण्यात आल्याचंही सांगितलं जात आहे. या पार्श्वभूमीवरच आज पुण्यात मुख्यमंत्री लाडकी बहीण योजनेचा शुभारंभ पार पडला. या कार्यक्रमात बोलताना मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी लाडकी बहीण योजनेमधून दिल्या जाणाऱ्या निधीबाबत मोठं विधान केलं. सर्वांनी आशीर्वाद आणि बळ दिलं तर १५०० रुपयांचे ३००० होतील, असं मुख्यमंत्री शिंदे यांनी म्हटलं आहे.

ज्यांनी-ज्यांनी कोवीडच्या काळातही सोडलं नाही. पुण्यात देखील काही कोवीड सेंटर्स उभे केले आणि खोटे रुग्ण दाखवले, खोटे डॉक्टर दाखवले. एवढंच नाही तर रुग्णांच्या तोंडची खिचडीही पळवली. त्यांना तुमच्या तोंडचा घास पळवायचा होता. आताही तुमच्या तोंडचा घास हिरवण्याचा प्रयत्न होत



आहे. विरोधक लाडकी बहीण योजनेच्या विरोधात न्यायालयात गेले. पण मी तुम्हाला सांगतो की, आनंदाचा शिधा आपण दिवाळी दसरा आणि गणपतीमध्ये देतो. त्यामध्ये रवा, मैदा, साखर, तेल, डाळ असं सर्व असतं. त्याही विरोधात ते न्यायालयात गेले होते. विरोधक हे पाप कुठे फेडणार आहे? मात्र, आपल्याला त्यांची जागा दाखवण्याची आवश्यकता आहे, असा हल्लाबोल मुख्यमंत्री शिंदेंनी विरोधकांवर केला.

अजित पवार यांनी देखील आपल्याला सांगितलं, आता मी देखील सांगतो की, आम्ही तुम्हाला १५०० रुपये महिन्याला देत आहेत, म्हणजे वर्षाला १८ हजार रुपये. ही लाडकी बहीण योजना अशीच सुरु राहणार आहे. उद्या आपल्या सरकारची ताकद आणखी वाढली आणि तुम्ही सर्वांनी आशीर्वाद दिला तर या दीड हजारांचे पावणे दोन हजार होतील, पावणे दोन हजारांचे दोन हजार होतील, तुम्ही बळ दिलं तर दोन हजारांचे अडीच हजार होतील आणि अडीच हजारांचे तीन हजार होतील, असं मोठं विधान मुख्यमंत्री शिंदे यांनी केलं.

आपल्या सर्वांना माहिती आहे की मी कार्यकर्त्यांमधून आणि सर्वसामान्य कुटुंबातून इथपर्यंत आलो आहे. मी आणि आमचे दोन्ही उपमुख्यमंत्री । पान ४ वर

जागतिक बँकेच्या अहवालात धक्कादायक माहिती

## जगातील प्रत्येक चौथा देश होणार अधिक गरीब

नवी दिल्ली : गरिबांच्या प्रगतीसाठी आपल्याला एकत्र काम करावं लागेल असं वक्तव्य अर्थमंत्री निर्मला सीतारामण यांन केलं आहे. विकासाच्या या प्रवासात उपेक्षित लोकांना सामावून घेणे हे आमचं ध्येय असल्याचे सीतारामण म्हणाल्या. व्हॉईस ऑफ ग्लोबल साउथ समिटला संबोधित करताना त्या बोलत



होत्या. पैशाची कमतरता ही विकसनशील देशांच्या प्रगतीत अडथळा ठरत आहे. त्यामुळे शाश्वत विकास उद्दिष्टे साध्य करण्यासाठी ४ ट्रिलियन डॉलर्सची नितांत गरज असल्याचे अर्थमंत्री सीतारामण म्हणाल्या.

अर्थमंत्री निर्मला सीतारामण यांनी दिलेल्या माहितीनुसार, जागतिक बँकेच्या ताज्या अहवालानुसारया वर्षाच्या अखेरीस दर चार विकसनशील देशांपैकी एक देश अधिक गरीब होईल. या देशांची अवस्था ही कोविड महामारीपूर्वी असलेल्या परिस्थितीसारखी होऊ शकते. या देशांमध्ये शाश्वत विकास उद्दिष्टे साध्य करणे हे अत्यंत कठीण काम होत आहे. काही बाबींवर हे देश पुढे जाण्याऐवजी मागे जात आहेत. परिस्थिती हाताळायची असेल तर ४ ट्रिलियन डॉलर्स खर्च करावा लागेल. जगातील अनेक देशात परिस्थिती अधिक गंभीर होत असल्याचे सीतारामण म्हणाल्या.

निर्मला सीतारामण यांनी दिलेल्या माहितीनुसार, विकास आणि गरिबी निर्मूलन कार्यक्रमांवर वाईट परिणाम झाला आहे. भारताने जी२० च्या अध्यक्षपदी असतानाही हे मुद्दे उपस्थित केले होते. आर्थिक मदत मिळवण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न केले जात आहेत. विकासाच्या मदतीने अनेक समस्यांवर मात करता येऊ शकते, । पान ४ वर

# केंद्र सरकारकडून समितीची घोषणा, आरोग्यसेवा व्यावसायिकांच्या सुरक्षेसाठी उपाययोजना, डॉक्टरांचा देशव्यापी संप

**दैनिक यश सिद्धी न्यूज**

नवी दिल्लीः आरोग्यसेवा व्यावसायिकांच्या सुरक्षेसाठी समिती स्थापन करण्यात येईल अशी घोषणा केंद्रीय आरोग्य मंत्रालयाने शनिवारी केली. ही समिती या व्यावसायिकांच्या सुरक्षेसाठी उपाययोजना सुचवेल असे सांगण्यात आले. या समितीसमोर सूचना मांडण्यासाठी राज्य सरकारांसह सर्व संबंधित प्रतिनिधींना आमंत्रित केले जाईल. त्याच वेळेला, कोलकाता घटनेच्या निषेधार्थ निदर्शने करणाऱ्या डॉक्टरांनी कामावर परत जावे, अशी विनंतीही आरोग्य मंत्रालयाने केली.कोलकाता घटनेच्या पार्श्वभूमीवर 'फेडरेशन ऑफ रेसिडेंट डॉक्टर्स असोसिएशन' (फोर्डा), 'इंडियन मेडिकल असोसिएशन' (आयएमए) आणि दिल्लीतील सरकारी वैद्यकीय महाविद्यालये आणि रुग्णालयांच्या



निवासी डॉक्टरांच्या संघटनांच्या प्रतिनिधींनी केंद्रीय आरोग्यमंत्र्यांची भेट घेतली. त्यावेळी डॉक्टरांच्या संघटनेने कामाच्या ठिकाणी आरोग्यसेवा व्यावसायिक आणि कर्मचाऱ्यांची सुरक्षा व सुरक्षितता याविषयी मागण्या मांडल्या. या मागण्या ऐकून घेण्यात आल्या असून त्यांच्या सुरक्षेसाठी शक्य ते सर्व प्रयत्न केले जातील असे आश्वासन देण्यात आल्याची माहिती सरकारकडून देण्यात आली. आतापर्यंत २६ राज्यांनी आरोग्यसेवा कर्मचाऱ्यांच्या संरक्षणासाठी कायदे केल्याचेही सांगण्यात आले. डेंग्यू आणि हिवतापाचे रुग्ण वाढत असल्यामुळे डॉक्टरांनी आंदोलन मागे घ्यावे,असे आवाहन सरकारतर्फे करण्यात आले आहे.

उत्तर कोलकात्यामधील आर जी कर वैद्यकीय महाविद्यालय आणि रुग्णालयातील पदव्युत्तर शिक्षण घेणाऱ्या प्रशिक्षणार्थी डॉक्टरवर झालेल्या बलात्कार आणि हत्येप्रकरणी देशभरात सरकारी रुग्णालयांमधील । पान ४ वर

## मुख्यमंत्रीपदाचा चेहरा जाहीर करा; उद्धव ठाकरे यांची भूमिका



मुंबई : महाविकास आघाडीकडून मुख्यमंत्रीपदाचा चेहरा कोण? असा प्रश्न विरोधक सातत्याने विचारत आहेत. मी मुख्यमंत्रीपद सोडले ते महाराष्ट्रासाठी. मी माझ्यासाठी लढत नसून महाराष्ट्राच्या स्वार्थासाठी लढतो आहे. महाविकास आघाडीने मुख्यमंत्रीपदाचा चेहरा आताच जाहीर करावा. त्याला माझा पाठिंबा आहे, या शब्दात शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी आपली भूमिका शुक्रवारी स्पष्ट केली.

'मविआ'च्या निर्धार मेळाव्याचे षण्मुखानंद सभागृहात आयोजन करण्यात आले होते. यावेळी व्यासपीठावर राष्ट्रवादी काँग्रेसचे शरद पवार, सुप्रिया सुळे, काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष नाना पटोले, विधिमंडळ पक्षनेते बाळासाहेब थोरात, माजी मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण आदी नेते उपस्थित होते. 'लोकसभेची लढाई संविधान वाचवण्याची होती, विधानसभेची लढाई महाराष्ट्र धर्म, महाराष्ट्र संस्कृती वाचवण्याची आहे. 'मविआ'चे दूत म्हणून गावागावात जा आणि आपल्या कामाचा प्रचार करा. वज्रमूठ शब्दात नको, ती प्रत्यक्षात हवी. उमेदवारी मिळाली नाही तरी चालेल. पण त्यांना झोपवू याची शपथ घ्या, असे आवाहन उद्धव यांनी उपस्थित कार्यकर्त्यांना केले. ५० टक्क्यांच्या पुढे आरक्षण नेऊन मराठ्यांना आरक्षण देण्यास आपला पाठिंबा आहे', असे त्यांनी स्पष्ट केले.

'भाजपात २५ वर्षे भोगले ते आघाडीत होता कामा नये. ज्यांच्या जास्त जागा त्याचा मुख्यमंत्री हे धोरण नको. आघाडीत पाडापाडीचे राजकारण होता कामा नये. जागा कुणाच्याही वाट्यास येवो एकदिलाने प्रचार करा. लोकसभा निवडणुकीने दाखवलेली दिशा कायम ठेवण्यासाठी। पान ४ वर

# विठ्ठलभक्तांसाठी मोठी खुशखबर! भाविकांना आषाढीतही मिळणार केवळ २ तासात दर्शन, ११० कोटी रुपयांचा आराखडा मंजूर

**दैनिक यश सिद्धी न्यूज**

पंढरपूर/प्रतिनिधी : मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी घोषणा केल्याप्रमाणे तिरुपतीच्या धर्तीवर विठ्ठल-रुक्मिणीच्या मंदिरात टोकं दर्शनाची घोषणा केल्यानंतर शनिवारी यासाठीचा दर्शन मंडप आणि स्कायवॉक साठी राज्य सरकारच्या उच्चाधिकार समितीने मान्यता दिली आहे. यामुळे आता पंढरपुरातील लांबच लांब दर्शन रांग इतिहासजमा होणार असून आषाढी एकादशीलाही भाविकांना केवळ २ तासात दर्शन मिळण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. यासाठी ११० कोटी रुपयाचा आराखडा मंजूर झाला असून आता पुढील महिन्याभरात या कामाला सुरुवात होऊ शकणार असल्याचे जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी सांगितले .



यासाठी गोपाळपूर पत्राशेड येथे चार मजली अद्ययावत दर्शन मंडप उभारण्यात येणार असून येथून थेट मंदिरापर्यंत १०५० मीटर लांबीचा स्काय वॉक उभारण्यात येणार आहे. पंढरपुरात येणाऱ्या भाविकांना ऑनलाईन किंवा ऑफ लाईन आपले टोकन घ्यावे लागणार असून टोकन वर दिलेल्या वेळेपूर्वी अर्धातास या भाविकांना या प्रतीक्षा कक्षात पोचावे लागेल . यानंतर मोजून दीड ते दोन तासात हा भाविक थेट विठ्ठल -रुक्मिणीच्या मंदिरात या स्कायवॉक मधून चालत पोचू शकणार आहे.

आज याचा आराखडा मंजूर करण्यात आला असून या चार माजली दर्शन मंडपात भाविकांना स्वच्छतागृहे , उपहारगृह , आरोग्य व्यवस्था तसेच विश्रांती कक्ष उभारले जाणार आहेत. जिल्हा प्रशासनाने सादर केलेल्या १२९ कोटीच्या आराखड्यापैकी राज्याच्या मुख्य सचिव सुनीता सौनिक यांच्या अध्यक्षतेखालील। पान ४ वर

## एकरुख उपसा सिंचन योजनेच्या लाभक्षेत्रातील अतिरिक्त पाणी २० ऑगस्टपासून सोडणार





**दैनिक यश सिद्धी न्यूज**

अक्कलकोट/प्रतिनीधीः उजनी धरण पूर्ण क्षमतेने भरलेले असल्याने जादा पाणी नदीद्वारे व कालव्याद्वारे सोडण्यात येत आहे. हे पुराचे जादा पाणी मध्यम प्रकल्प व एकरुख उपसा सिंचन योजनेच्या लाभक्षेत्रातील इतर तलावात सोडण्यात यावे अशी मागणी अक्कलकोटचे आमदार सचिन कल्याणशेट्टी यांनी जिल्हाधिका-यांकडे केली होती.

याबाबत जिल्हाधिकारी कार्यालयात शनिवारी जिल्हाधिकारी यांच्या प्रमुख उपस्थित बैठक झाली. त्यात २० ऑगस्ट २०२४ पासून हे जादा पाणी एकरुख प्रकल्पात सोडण्यास जलसंपदा विभागाच्या अधिकाऱ्यांनी मान्यता दिली. एकरुख उपसा सिंचन योजनेच्या लाभक्षेत्रातील बोरी मध्यम प्रकल्प, दर्गनहळ्ळी, कर्देहळ्ळी, रामपूर व आवश्यकतेनुसार अन्य लगतच्या तलावात पाणी सोडण्यात येणार आहे.एकरुख उपसा सिंचन योजनेच्या करंबा कालव्यातील गाळ काढणे, करंब पंपगृह, हगलुर पंपगृह व बोरामणी पंप गृहातील यांत्रिकी व विद्युत विभागाची सर्व कामे पूर्ण झाल्याची माहिती जलसंपदा विभागाच्या अधिकाऱ्यांनी यावेळी दिली. यावेळी जलसंपदा अधीक्षक अभियंता श्री. ज्ञानदेव बागडे , धीरज साळे, महसूल उपजिल्हाधिकारी श्री. अमृत नाटेकर, कार्यकारी अभियंता श्री. धनंजय कोंडेकर, श्री. मोहन जाधवर व अन्य अधिकारी उपस्थित होते.

## सोलापुरात मघा नक्षत्राच्या सरी खरीप पिकांसाठी पोषक



**दैनिक यश सिद्धी न्यूज**

सोलापूर : यंदाच्या पावसाळ्यात सोलापूर जिल्ह्यात सर्वत्र बेताबेताने पिकांना पोषक ठरणारा पाऊस पडत आहे. मागील काही दिवसांत पावसाने उघडीप दिल्यानंतर तीव्र उकाडा जाणवत असताना, खरीप पिकांच्या वाढीसाठी पुन्हा पावसाची सार्वत्रिक अपेक्षा होती. सुदैवाने मघा नक्षत्राला प्रारंभ झाल्यानंतर कमी-जास्त प्रमाणात पावसाची हजेरी लागत आहे. त्यामुळे शेतकरी सुखावले आहेत. ढगांच्या गडगडाटासह मघा नक्षत्राच्या सरी कोसळत असल्यामुळे उकाड्याची तीव्रता कमी जाणवत आहे. काल शुक्रवारी रात्री पावसाच्या हलक्या व मध्यम सरी कोसळल्यानंतर शनिवारी, दुसऱ्या दिवशी पुन्हा पावसाने हजेरी लावली. दक्षिण सोलापूर (१३.५), मोहोळ (१८), माढा (१५.३), करमाळा (१६.५), पंढरपूर (१६.४), माळशिरस (८.८), अक्कलकोट (८.४) आदी तालुक्यांमध्ये पिकांसाठी पोषक ठरणारा पाऊस झाला. उत्तर सोलापूर, बार्शी, मंगळवेढा, सांगोला या भागात तुलनेने अत्यल्प पाऊस झाला.

जिल्ह्यात यंदा समाधानकारक पावसामुळे खरीप हंगामात पिकांचा पेरा वाढला आहे.। पान ४ वर

# सुप्रीम कोर्टच जर निर्णय घेत असेल तर संसदेचे काय काम ? मग संसद बरखास्त केलेली बरी : तृणेश देवळेकर

## संपादकीय

### त्याची मदत होईल...

आश्रमशाळांमधील बारा हजारांवर विद्यार्थ्यांना सरकारकडून कौशल्य विकासाचे धडे दिले जाणार आहेत. त्यात नववी ते बारावीपर्यंतच्या विद्यार्थ्यांचा समावेश आहे. गेल्या वर्षी सहा हजार विद्यार्थ्यांनी विविध प्रकारचे कौशल्य कमावले, असे प्रसिध्द झालेल्या एका बातमीत म्हटले आहे. भारतात बेरोजगारीचा दर वाढत आहे. तो ४५ टक्क्यांच्या आसपास असल्याचे सांगितले जाते. आंतरराष्ट्रीय कामगार संघटनेच्या नुकत्याच प्रसिध्द झालेल्या अहवालातही याविषयी चिंता व्यक्त करण्यात आली आहे. बेरोजगारीची अनेक कारणे तज्ज्ञ सांगतात, पदवीधर तरुणांमध्ये किमान कौशल्ये आढळत नाहीत. रोजगाराची क्षेत्रे बदलत आहेत. नवनवीन क्षेत्रे उदयास येत आहेत. गेल्या एक दशकापर्यंत त्याचा अंदाजदेखील व्यक्त केला गेला नसेल. परिणामी भविष्यकाळाचा वेध घेऊन शिक्षण कौशल्ये आणि रोजगार यांची सांगड घातली जावी, असे आवाहन करण्यात येत आहे. रोजगार मिळवण्याबरोबरच तरुणांनी स्वयंरोजगार निर्माण करणे जाणत्यांना अपेक्षित आहे. त्या दृष्टीने कौशल्य विकासाची योजना राबवण्याचा सरकारचा कदाचित तो प्रयत्न असावा, बेरोजगारीवर मात करण्यासाठी रोजगार प्रशिक्षण आणि रोजगार निर्मिती हाच व्यवहार्य उपाय आहे. सरकारी आणि खासगी पातळीवर मुलांची कलचाचणी केली जाते. योग्य प्रशिक्षण मिळाले तर त्यातील अनेकांना त्यांची भविष्याची दारे खुणावू शकतात. वयाच्या त्याच टप्प्यावर १९ प्रकारची कौशल्ये शिकवली जाणार आहे. तथापि त्याकरिता योजनेची नियोजनपूर्वक अंमलबजावणी होणे अपेक्षित आहे. सरकारी योजनांना 'फाइलबंद' होण्याचा शाप आढळतो. राबवल्या गेल्या तरी योजना राबवली हा शेरा मारणे एवढाच त्यामागचा उद्देश आढळतो, योजनेचा लाभ मिळवण्यासाठी बऱ्याच कागदपत्रांचे भेंडोळे सादर करावे लागते, असा जनतेचा अनुभव आहे. ती कागदपत्रे जमवताना इच्छुकांच्या नाकीनऊ येते. त्यामुळे लाभ नको, पण कागदपत्रे आवर, अशी भावना लोक व्यक्त करतात. या योजनेच्या बाबतीत तसे होणार नाही याची दक्षता सरकारने घेतलीच असेल. सरकारी योजनांची जशी घोषणा केली जाते त्याचप्रमाणे त्या योजनांच्या अंमलबजावणीचा अहवालही जाहीर केला जाईल का? गेल्या वर्षी सहा हजार विद्यार्थ्यांना कौशल्य प्रशिक्षण दिले गेल्याचा दावा केला गेला आहे, पण या आकड्यासोबतच प्रशिक्षणामुळे विद्यार्थ्यांमध्ये कोणते बदल झाले? हेही जाहीर केले गेले तर बरे! योजनेची विश्वासार्हता वाढायला त्याची मदत होईल.

**आरक्षणात उपवर्गीकरण करणाऱ्या सुप्रीम कोर्टाचा तृणेश देवळेकर यांनी घेतला समाचार**

१ ऑगस्ट २०२४ रोजी सुप्रीम कोर्टाचे सर न्यायाधीश डी.वाय.चंद्रचुड न्या.बी आर गवई,विक्रम नाथ,बेला एम त्रिवेदी, पंकज मिथल,मनोज मिश्रा,सतीश चंद्र शर्मा या न्यायमूर्तींनी न्यायमूर्ती बेला त्रिवेदी वगळता ६ विरुद्ध १ असा बहुमतांनी अनुसूचित जाती – जमाती आरक्षणात उप- वर्गीकरणास सहमती दर्शवली आहे.या निर्णयामुळे अनुसूचित जाती जमातीतील जाती जातीमध्ये भांडणे लागतील एकमेकांसमोर उभे टाकतील त्यामुळे अनुसूचित जाती जमातीची एकसंघ असलेली ताकद कमी होईल. २००४ सालच्या इ.व्ही.चिन्नैय्या विरुद्ध आंध्रप्रदेश स्टेट या खटल्यात सुप्रीम कोर्टाने दिलेला आपलाच संवैधानिक निर्णय बहुमताच्या जोरावर बदलून असंवैधानिक निर्णय देऊन संविधानावर घाला घालण्याचे पाप सुप्रीम कोर्टाने केले आहे.याही अगोदर सुप्रीम कोर्टाने नको तिथे नाक खुपसण्याचे काम केले होते.यापुर्वीही अनेकदा संविधानाच्या बेसिक स्ट्रक्चर वर घाला घालण्याचे काम हि सुप्रीम कोर्टाने काम केले होते.उदा. १९५१मध्ये शंकरी प्रसाद विरुद्ध भारत सरकार व १९६४ मध्ये सज्जन सिंह विरुद्ध राजस्थान स्टेट मध्ये सुप्रीम कोर्टाने सांगितले होते की आर्टिकल ३६८ नुसार संसद संविधानाच्या कोणत्याही भागामध्ये/कलमांमध्ये (मूलभूत ढाच्या सहित) बदल करू शकतो.असा असंवैधानिक निर्णय देऊन सुप्रीम कोर्टाने भारतीय संविधानाला फासावर लटकवले होते.नंतर तोच निर्णय १९६७मध्ये गोलकनाथ विरुद्ध पंजाब स्टेट प्रकरणात सुप्रीम कोर्टाने दुरुस्त केला होता आणि सांगितले होते की संसद संविधानाच्या बेसिस्ट्रक्चरला हात लावू शकत नाही.तसे बघितले तर डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी भारतीय संविधान भाग ५ व्हश पणळेप मधील कलम १४१ नुसार दिलेला निर्णय हा भारताचा कायदा असतो व तो सर्वांवर बंधनकारक जरी असला तरी त्याच संविधानाच्या आर्टिकल १९ (१) अ नुसार सुप्रीम कोर्टाच्या निर्णयावर माझे मत व्यक्त करण्याचा अधिकार मला संविधानाने दिलेला आहे.मला एक उदाहरण आठवले १९५१ ला जेव्हा पहिली घटना दुरुस्ती झाली तेव्हा डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणाले सुप्रीम कोर्टाचा निर्णय जरी मला बंधनकारक असला तरी मी तो निर्णय मानलाच पाहिजे असे काही नाही चुकीच्या निर्णयाचा धिक्कार करण्याचा माझा संविधानिक अधिकार कोणी हिरावून घेऊ शकत नाही म्हणूनच मी हा लेख लिहीत आहे.तसेच डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी संविधानाच्या माध्यमातून सर्वोच्च न्यायालयावर अर्थात सुप्रीम कोर्टावर फार मोठी जबाबदारी टाकलेली आहे.

१) संविधानाचे जतन करणे

२) संविधानातील कलमाचा योग्य तो अर्थ लावणे

३) संसदेने बहुमताच्या जोरावर केलेले चुकीचे कायदे रद्द करणे

४) एखाद्या विषयाला अनुसरून संविधानात स्पष्ट तरतूद नसेल किंवा कलम नसेल तर तेव्हा १) प्रस्ताविक २) संविधान सभेतील चर्चा ३) भाग ४अ चार आधार घेऊन निर्णय घेणे आदी जबाबदारी सुप्रीम कोर्टावर सोपविली आहे.पण दुर्दैव असे की बऱ्याचदा सुप्रीम कोर्टच स्वतच संसद बनु पाहत आहे.हे अनुसूचित जाती जमातीतील आरक्षणातील उप-वर्गीकरण करण्यास दिलेल्या मान्यते वरुन सिद्ध होते.मुळातच कायदा करणे हे सुप्रीम कोर्टाचे काम नाही तर ते संसदेचे काम आहे.सुप्रीम कोर्टाचे असे वागणे संविधाना साठी फार घातक आहे.लोकशाही वर फार मोठा हल्ला आहे.सुप्रीम कोर्टा समोर अनुसूचित जाती – जमाती चा आरक्षणा संदर्भात क्रिमिलेयर मुद्दाच नव्हता तसेच क्रिमिलेअर अनुसूची जाती जमातीला लावावे असे भारतीय संविधानात कुठेही सांगितले नाही.अनुसूचित जाती जमातींना आरक्षण दिले ते आर्थिक आधारावर नाही तर सामाजिक आणि शैक्षणिक आधारावर आरक्षण दिलेले आहे.असे असताना सुप्रीम कोर्ट अनुसूचित जाती जमातीच्या आरक्षणाचे जतन करण्या ऐवजी कुंपणच शेत खात आहे अशी परिस्थिती निर्माण झालेली आहे.सुप्रीम कोर्टाने क्रिमीलेअर संदर्भात दिलेला निर्णय अत्यंत दुर्दैवी व दुरगामी परिणाम करणारा आहे.मुळातच मोदी सरकारला जे अपेक्षित होते.तसेच निर्णय सुप्रीम कोर्ट घेते की काय अशी शंका आमच्या मनात निर्माण झालेली आहे.हा निर्णय राजकीय अंगाने घेतल्याचा या निर्णयाला वास आहे.त्यामुळे काहींना ह्या निर्णयाचा राजकीय लाभ होण्याची शक्यता आहे.कारण लोकसभा निवडणूक प्रचारार्थ आंध्रप्रदेश मध्ये गेल्यानंतर तेथे अनुसूचित जाती आरक्षणात उप वर्गीकरण करण्या संदर्भात नरेंद्र मोदींनी आपल्या भाषणात आश्वासन दिलेले होते.अनुसूचित जाती जमाती आदेश १९५० हा राष्ट्रपतींनी काढलेला आदेश आहे त्यात स्पष्टपणे सांगितलेला आहे अनुसूचित जाती जमातीच्या आदेशा मध्ये कॉमा जरी बदलायचा असेल तर ते राष्ट्रपतीच बदलू शकतात किंवा राष्ट्रपतीला बदलण्यासाठी संसद शिफारस करू शकते.म्हणजेच संसदेचे कार्य न्यायालयाने आपल्या ताब्यात घेतले आहे.संसदेच्या कार्यावर अतिक्रमण केलेले आहे. संसदेच्या कामात ढवळा ढवळ सुरू केलेली आहे संसदेच्या कामात सुप्रीम कोर्टाने हस्तक्षेप केलेला आहे. क्रिमीलेयर हा शब्द संविधानात कुठे नाही क्रिमीलेअरचा जन्म १६ नोव्हेंबर १९९२ इंदिरा साहणी प्रकरणात ज.इ.उ.च्या संदर्भात झाला होता.क्रिमीलेअर ची संकल्पना म्हणजे सामाजिक मागासलेपणाचे आरक्षण काढून आर्थिक निकषावर आरक्षण देण्याचे षडयंत्र दिसून येत असून ते संविधान विरोधी आहे.मुळातच अनुसूचित जातीच्या आरक्षणात उपवर्गीकरण करण्यापाठी मागील पार्श्वभूमी अशी.....

१) १९७५ ला पंजाब सरकारने वाल्मिकी आणि मजहबी शिख समुदायांना ड.उ.आरक्षणात ५०% आरक्षण देण्याचा कायदा केला होता.

२ ) १९९४हरियाणाचे मुख्यमंत्री भजन लाल यांनी तर

३) १९९७ ला आंध्र प्रदेशचे मुख्यमंत्री चंद्राबाबू नायडू यांनी मादीगा जातीसाठी अनुसूचित जातीमध्ये उप वर्गीकरण करण्यासाठी निवृत्त न्यायाधीश रामचंद्र राजू यांच्या अध्यक्षतेखाली आयोग नेमून त्या आयोगाच्या शिफारशीनुसार दि. २/५/२००० रोजी अनुसूचित जाती आरक्षणात अ,ब,क,ड असे वर्गीकरण करून त्यास मान्यता दिली होती. दि. ५नोव्हेंबर २००४ रोजी सुप्रीम कोर्टाचे न्यायाधीश एन. संतोष हेगडे यांच्या अध्यक्षतेखाली न्यायमूर्ती एस.एन.वारीयावा, बी.पी.सिंह,एस.के.सेमा,एस.बी.सिन्हा ह्या ५ न्यायमूर्तींच्या खंडपीठाने ई.व्ही चिन्नैय्या विरूध्द आंध्र प्रदेश स्टेट प्रकरणात अनुसूची जाती आरक्षणात उपवर्गीकरण करण्या संदर्भात सुप्रीम कोर्ट आपल्या निर्णयात म्हणाले होते की

१) अनुसूचित जातीमधील आरक्षणात छेडछाड अर्थात आरक्षणात वर्गीकरण करण्याचे अधिकार राज्याना नाही.

२) अनुसूचित जाती मध्ये वर्गीकरण करणे म्हणजेच आर्टिकल १४चे उल्लंघन आहे.

३) कलम ३४१ नुसार राष्ट्रपती संसदेच्या निर्णया नुसार अनुसूचित जाती मध्ये कोणाला घ्यायचे आणि कोणाला काढायचे यांचे निर्णय फक्त राष्ट्रपती घेऊ शकतात इतर कोणीही नाही.

डॉ.किसन पॉल विरुद्ध पंजाब स्टेट प्रकरणात २००६ मध्ये पंजाब /हरियाणा हायकोर्टाने ई.व्ही.चिन्नैय्या प्रकरणाचा हवाला देऊनच पंजाब सरकारने दिलेले आरक्षण उच्च न्यायालयाने रद्द केले होते.पुन्हा परत २००६ मध्ये पंजाब सरकारने कायदा करून वाल्मिकी आणि मजहबी शिख समुदायांना एस.सी.आरक्षणात ५० टक्के आरक्षण दिले होते.ते पुन्हा २०१० ला पंजाब व हरियाणा हायकोर्टाने रद्द केले होते.त्याला सुप्रीम कोर्टात चॅलेंज करण्यात आले होते. २०२० मध्ये न्यायमूर्ती अरुण मिश्रा आणि ५ न्यायाधीशाच्या खंडपीठाने दविंदर सिंग विरुद्ध पंजाब स्टेट मध्ये सुप्रीम कोर्टाने सांगितले की आता आपल्याला २००४ च्या प्रकरणातील ई.व्ही.चिन्नैया प्रकरणात सुप्रीम कोर्टाने दिलेल्या निर्णयाशी आम्ही असमत आहोत ई.व्ही चिन्नैय्या प्रकरणाचा पुनर्विचार करणे अत्यंत आवश्यक आहे.पुढे न्यायालय म्हणाले की आम्हाला नुसते डोळे झाकून चालणार नाही. कारण अनुसूचित जाती हा एक संघ गट नाही अनुसूचित जातीमध्ये विषमता आहे.त्यामुळे आमच्या आणि ई.व्ही. चिन्नैया प्रकरणातील खंडपीठात समान ५ न्यायाधीश असल्यामुळे हा निर्णय मोठ्या घटना पिठाकडे वर्ग करणे आवश्यक आहे त्यानुसार अनुसूचित जाती जमाती आरक्षणातील वर्गीकरण या संदर्भातील निर्णय घेण्यासाठी सरन्यायाधीश डी.वाय. चंद्रचूड त्यांच्या अध्यक्ष खाली व ६ जजचे खंडपीठ नेमण्यात आले होते.त्यावर निर्णय देताना १ ऑगस्ट २०२४ रोजी सुप्रीम कोर्ट म्हणाले......

१) अनुसूचित जाती जमातीच्या आरक्षणामध्ये वर्गवारी करता येते.

२) क्रिमिलेयर अर्थात उन्नत व प्रगत गटाला आरक्षणाचे लाभ देण्यात येऊ नये.

३) आरक्षण पहिल्या पिढीसाठी असावे.

४) आरक्षणाचा लाभ घेऊन एखादी पिढी उच्च पदावर केली असेल तर पुढच्या पिढीला आरक्षण देऊ नये

५) क्रिमिलियर वर्गीकरणामुळे आर्टिकल १४ ला बाधा येत नाही

मला सुप्रीम कोर्टाला विचारायचचे आहे जर कायदे सुप्रीम कोर्ट करू लागले तर मग संसदेचे काय काम आहे संसद बरखास्त केली तर चालेल का ?

प्रश्न क्रमांक २ मला सुप्रीम कोर्टाला विचारायचचे कलम १६ (४) नुसार आरक्षण हे सामाजिक मागासले पणावर आहे तो दारिद्र्य निर्मूलन किंवा गरीब हटावचा कार्यक्रम नाही तर ते पर्याप्त प्रतिनिधित्व आहे.असे असताना क्रिमिलियर ची अट का ? आजही अनुसूचित जातीमधील सामाजिक मागासपण दूर झाले आहे का तर नाही उलट इतिहासाची पाने चाळत असताना असताना जातिने चांभार असलेल्या जगजीवनराव या केंद्रीय मंत्र्यांनी बिहारमध्ये एका पुतळ्याचे उद्घाटन केले होते तेंव्हा ३ तासांनीच जातीवाद्याने तो पुतळा दुधाने धुतला होता.तत्कालीन राष्ट्रपती रामनाथ कोविंद हे तिरुपती बालाजीच्या दर्शनासाठी गेल्यानंतर पुजारीने त्यांना गाभाऱ्याला जाऊ दिले नाही.अनुसुचीत जातीच्या केंद्रीय मंत्री व राष्ट्रपती यांची परिस्थिती अशी आहे तर अनुसूचित जातीमधील आम माणसाची परिस्थिती काय असेल आम मानसाचे सामाजिक मागासले पण दूर करण्यासाठी सुप्रीम कोर्ट का पावले उचलत नाहीत याचे ही उत्तर सुप्रीम कोर्टाने दिले पाहिजेत.तुम्ही म्हणता अनुसूचित जाती जमाती आरक्षणात उपवर्गीकरण केल्यामुळे व क्रिमीलेअरची अट लावल्यामुळे आर्टिकल १४ ला बाधा येत नाही.मला सुप्रीम कोर्टाला विचारायचे आहे.जशी जइउ मध्ये क्रिमिलेयरची अट आहे.तशी आपण डउ.,ढ्ढ.मध्ये क्रिमिनलची अट लावली आहे.मग तसाच एक प्रवर्ग आहे.ज्याला खुला प्रवर्ग ( जशिप) असे म्हणतात.त्या खुला प्रवर्गामध्ये आतापर्यंत आरक्षणाचे लाभ अनेक लोकांना मिळाले नाहीत.मग आपण खुल्या प्रवर्गात क्रिमीलेअरची अट का लावली नाही त्यामुळे आर्टिकल १४ ला बाधा येत नाही का ? तर कलम १४ ला १००% बाधा येते त्यामुळे तुमचा १००टक्के निर्णय चुकलेला आहे.२५ नोव्हेंबर १९४९ ला देशाला संविधान अर्पण करताना संविधान सभेत डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे भाषण झाले त्या भाषणात बाबासाहेब म्हणतात देशात राजकीय समानता आली आपल्याला लवकरात लवकर सामाजिक व आर्थिक समानता आणावी लागेल अन्यथा सामाजिक आर्थिक याने पिळलेले लोक लोकशाहीचा डोलारा उद्ध्वस्त करतील त्यासाठी देशात आर्थिक समता आणण्यासाठी ,शेती,व्यवसाय,शासकीय योजना,राजकीय पदे, कारखाने इत्यादीमध्ये सुप्रीम कोर्टाने क्रिमीलेअर लावुन दाखवावे. सुप्रीम कोर्ट हे शंभर कुटुंबा पुरते मर्यादित आहे सुप्रीम कोर्टा मध्येही क्रिमीलेयर सुप्रीम कोर्ट लावून दाखवावे तरच अनुसूचित जाती जमाती मध्ये क्रिमिलेयरची अट व उप वर्गीकरण करण्याचा नैतिक अधिकार सुप्रीम कोर्टाला आहे असे मला स्वत:ला वाटते.अनुसूचित जाती जमाती आरक्षणातील उप वर्गीकरण व क्रिमिलियरच्या सुप्रीम कोर्टाच्या निर्णयामुळे लोकशाहीची हत्या झाली असून लोकशाही धोक्यात आलेली आहे.सुप्रीम कोर्टाने जो निर्णय दिलेला आहे तो संविधान विरोधी निर्णय आहे.तो मनुवादी मानसिकतेतून व दलित न्यायमूर्तींना समोर करून दिलेला आहे.पुढे सर न्यायाधीश बनण्याच्या हव्यासापोटी तो दलित न्यायपूर्ती बळी पडलेला आहे.सुप्रीम कोर्टाचा हा निर्णय राष्ट्रपतींच्या,संसदेच्या अधिकारावर व संविधानाच्या मूलभूत ढाच्यावर अतिक्रमण करणारा असून अनुसूचित जाती जमाती लोकांमधील ताकद कमी करून भेदभाव निर्माण करणारा आहे.म्हणून एससी.एसटी.प्रवर्गातील लोकांनी वेळीच जागे होऊन संघटित होऊन मोदी सरकारवर दबाव टाकून सुप्रीम कोर्टाचा निर्णय रद्द करण्यासाठी संसदेत कायदा करण्यासाठी मोदी सरकारला भाग पाडावे. यासाठी भीम टायगर सेना रस्त्यावर उतरण्यासाठी केव्हाही तयार आहे.आज आरक्षणात वर्गीकरण केले उद्या सुप्रीम कोर्ट आपल्या सर्वांचे sc,st,obc चे आरक्षणच रद्द करेल आणि पुन्हा सुप्रीम कोर्ट म्हणेल की आर्टिकल १४ सांगते कायद्यापुढे सर्व समान आहेत.शेवटी कलमाचा अर्थ लावण्याचे काम सुप्रीम कोर्टाचे आहे **एवढे मात्र नक्की**

**तृणेश देवळेकर प्रदेश अध्यक्ष, समता पार्टी महाराष्ट्र.**
**मो. ८८२८७७३१२३**

## कोलकाता बलात्कार प्रकरण: पोस्टमॉर्टम रिपोर्टमध्ये ५ धक्कादायक खुलासे

**दैनिक यश सिद्धी न्यूज**

पुणे : कोलकाता येथील प्रशिक्षणार्थी डॉक्टरवर झालेल्या घृणास्पद बलात्कार प्रकरणाच्या पोस्टमॉर्टम अहवालात काही अत्यंत गंभीर आणि हृदयद्रावक खुलासे समोर आले आहेत. हे अहवाल केवळ गुन्ह्याची क्रूरता दाखवत नाहीत तर पीडितेच्या वेदना आणि संघर्षावर प्रकाश टाकतात.

१) असामान्य लैंगिकता आणि जननेंद्रियाचा छळ:* पोस्टमॉर्टम अहवालात असे दिसून आले आहे की पीडितेच्या खाजगी भागावर खोल जखमा आढळल्या आहेत, जे असामान्य लैंगिकता आणि जननेंद्रियाच्या छळाचे परिणाम आहेत. यावरून असे दिसून येते की, गुन्हेगाराने पीडितेला अत्यंत क्रूरपणे वागवले. २) गळा दाबण्याचा प्रयत्न:* पीडितेला किंचाळण्यापासून रोखण्यासाठी तिचे नाक, तोंड आणि घसा जोरात दाबण्यात आला, ज्यामुळे तिची थायरॉईड कूर्चा तुटली. यावरून हे स्पष्ट होते की पीडितेला मारण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न केले गेले.

३) शारीरिक दुखापती:* पीडितेचे डोके भिंतीवर घट्ट दाबल्यामुळे ती किंचाळू शकत नव्हती. याव्यतिरिक्त, त्याच्या पोटावर, ओठांवर, बोटांवर आणि डाव्या पायावर गंभीर जखमा देखील आढळल्या, ज्या कदाचित संघर्षाच्या वेळी झाल्या असतील.

४) *डोळ्यात चष्म्याचे तुकडे:* आरोपीने एवढ्या जोरावर हल्ला केला की पीडितेच्या चष्म्याचे तुकडे तिच्या डोळ्यात गेले. या अहवालात असे म्हटले आहे की, दोन्ही डोळे, तोंड आणि खाजगी भागातून रक्तस्राव होत होता, यावरून या जघन्य गुन्ह्याचा रानटीपणा दिसून येतो.

५) *चेहऱ्यावर नखांच्या खुणा:* पीडितेच्या चेहऱ्यावर आरोपीच्या नखांनी स्क्रॅचच्या खुणा आढळल्या, ज्यावरून असे दिसून येते की तिने स्वत:ला वाचवण्यासाठी खूप धडपड केली होती. या खुणा त्याच्या धाडसी लढ्याची साक्ष देतात.

हा पोस्टमॉर्टम रिपोर्ट समाजासाठी एक गंभीर इशारा आहे की आपण महिलांच्या सुरक्षेबाबत अधिक जागरूक आणि संवेदनशील असणे आवश्यक आहे. या प्रकरणामुळे देशभरात संतापाची लाट उसळली असून न्यायाची मागणी जोरात होत आहे.

## जगदगुरू पंचाचार्य प्रशालेच्या क्रीडा स्पर्धेत यश

**दैनिक यश सिद्धी न्यूज**

अक्कलकोट/प्रतिनिधी :गौडगाव बु!! येथील श्री गुरुसिद्ध मल्लेश्वर कल्याण केंद्र संचलित श्री जगदगुरू पंचाचार्य माध्यमिक व उच्च माध्यमिक प्रशालेचे महाराष्ट्र शासनाच्या शालेय शिक्षण व क्रीडा विभाग जिल्हा परिषद क्रीडा विभाग सोलापूर यांच्यामार्फत घेण्यात आलेल्या तालुकास्तरीय १४ वर्ष वयोगट मुलींच्या हॉलीबॉल संघाने उपविजय तर १७ वर्ष वयोगट मुलांचे संघ तालुक्यात तृतीय क्रमांक पटकावले आहे. तसेच ४४ वजनी गटाच्या मुलांच्या कुस्ती स्पर्धेत समर्थ हडपद प्रथम तर नागनाथ चलगरी द्वितीय क्रमांक मिळाला, १७ वयोगट योगासन स्पर्धेमध्ये शुभम कोरे यांनी द्वितीय क्रमांक मिळवले यशस्वी विद्यार्थ्यांना क्रीडा



शिक्षक परमेश्वर होसुरे, महेश स्वामी, विश्वनाथ धानशेट्टी,श्रीशैल सावळतोट ,लक्ष्मीपुत्र देशेट्टी, काशिनाथ धानशेट्टी यांचे मार्गदर्शन लाभले यशस्वी विद्यार्थ्यांचे मार्गदर्शक शिक्षकांचे संस्थेचे विश्वस्त शिवाचार्यरत्न श्री. ष. ब्र. डॉ. जय सिद्धेश्वर शिवाचार्य महास्वामीजी संस्थेचे सर्व पदाधिकारी गटशिक्षणाधिकारी प्रशांत अरबळे ,मुख्याध्यापक कल्याणी देशेट्टी, लाडाप्पा शिंदे,केंद्रप्रमुख भीमाशंकर धडके आदींनी अभिनंदन करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिले आहे.

हे वृत्तपत्र मालक, सिद्धार्थ सोशल फौंडेशन यांनी, मुद्रक, प्रकाशक, संपादक, कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे यांच्या सम्यक पब्लिकेशन्स अँड प्रिंटर्स २४७, बुद्ध विहार , रमाबाई आंबेडकर नगर, बुधवार पेठ सोलापूर ४१३००२ महाराष्ट्र येथे छापून मु.पो. गोगांव ता. अक्कलकोट जि सोलापूर ४१३२१८ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. संपादक : कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे email ; yashsiddhinews@gmail.com www.yashsiddhinews.com mo: 9921988358

This newspaper is printed by the Owner , Shidharth Social Foundation, Printer, Publisher, Editor, Kamalakar Dayndev Sonakamble at Samyak Publications and Printers 247, Budha Vihar, Ramabai Ambedkar Nagar, Budhwar Peth Solapur 413002 [Maharashtra], Published, at Gogaon Tal Akkalkot Dist Solapur 413218 [Maharashtra]. Editor : Kamalakar Dayndev Sonakamble

# स्वेरीच्या विद्यार्थ्यांचा गुजरातमध्ये झालेल्या प्रशिक्षणात सहभाग

**दैनिक यशसिद्धी न्युज**

पंढरपूर/प्रतिनिधीः गुजरात मधील सुरत येथील सरदार वल्लभभाई नॅशनल इन्स्टिटयूट ऑफ टेक्नोलॉजीच्या इलेक्ट्रिकल इंजिनिअरिंग या विभागामार्फत 'इलेक्ट्रिक व्हेईकल टेक्नोलॉजी टू वर्ड संस्टेनेबल ट्रान्सपोर्टेशन' अर्थात 'इव्हीटी-२०२४' या विषयावर प्रशिक्षण आयोजित करण्यात आले होते. स्वेरीज् कॉलेज ऑफ इंजिनिअरिंगच्या इलेक्ट्रॉनिक्स अँड टेलिकम्युनिकेशन इंजिनिअरिंग या विभागामधील विद्यार्थ्यांनी सहभाग घेवून इलेक्ट्रिक व्हेइकल तंत्रज्ञानाविषयी अद्ययावत माहिती जाणून घेतली.

स्वेरीज् कॉलेज ऑफ इंजिनिअरिंगच्या इलेक्ट्रॉनिक्स अँड टेलिकम्युनिकेशन इंजिनिअरिंग या विभागात तिसऱ्या व अंतिम वर्षात शिक्षण घेणाऱ्या प्रिती प्रशांत लोंढे, नेहा उद्धवराव




सोमवंशी व प्रणाली सदाशिव रगाटे या तीन विद्यार्थिनी व आदित्य विष्णुमूर्ती होल्ला, शुभम नेताजी थिटे, मुकुंद मारुती तळेकर, तानाजी पंढरीनाथ लंगोटे, साईराज प्रवीण राऊत व अभिषेक रत्नाकर मोहोळकर या सहा विद्यार्थ्यांची निवड झाली होती. पाच दिवस चाललेल्या या प्रशिक्षणामध्ये विद्यार्थ्यांना इलेक्ट्रिक वाहनांच्या मूलभूत गोष्टी, फायदे, या क्षेत्रातील नोकर्या, उद्योग आणि इतर पैलूंची ओळख करून देण्यात आली. इलेक्ट्रिक वाहनांबाबतची सरकारी धोरणे, इलेक्ट्रिक वाहने का निवडायची?, पारंपारिक इंधनावर चालणारी वाहने व इलेक्ट्रिक वाहने यामधील फरक या सर्व बाबींची माहिती देण्यात आली. इलेक्ट्रिक वाहनांची देखभाल, वाहनावर होणारा खर्च तसेच वाहनांची काळजी कशी घ्यावी, त्यांच्या किमती याबाबत माहिती देण्यात आली तसेच पारंपारिक वाहने पर्यावरणासाठी कशी हानिकारक आहेत, याबाबत विवेचन करण्यात आले. इलेक्ट्रिक वाहनांची नियंत्रण प्रणाली, पॉवर इलेक्ट्रॉनिक कन्व्हर्टर, आधुनिक इलेक्ट्रिक ड्राइव्ह, इलेक्ट्रिक वाहनांमध्ये वापरले जाणारे मायक्रो-कंट्रोलर आणि एम्बेडेड सिस्टीमची नेमकी भूमिका काय असते?, मल्टीफेसची ओळख, पाच फेज इंडक्शनने वेग नियंत्रण, मोटर रेटिंगची निवड, मॅटलॅब आणि विविध मॉडेल्सचे सिम्युलेशन या महत्त्वाच्या बाबींवर प्रकाश टाकण्यात आला. या बाबींच्या प्रात्यक्षिकासाठी टाटा मोटार व्हेईकल या कंपनीला भेट देण्यात आली. तेथील कर्मचाऱ्यांनी इलेक्ट्रिक वाहनांमध्ये वापरल्या जाणाऱ्या तंत्रज्ञानाची ओळख करून दिली तसेच इलेक्ट्रिक वाहन कंपनीचा सेल्स विभाग, मॉडेल डिझाइन, बॅटरी आदी बाबत प्रात्यक्षिके करून दाखवण्यात आली. या प्रशिक्षणामध्ये सहभागी असणाऱ्या विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र देऊन सन्मानित करण्यात आले. सदरचे प्रशिक्षण हे संस्थेचे संस्थापक सचिव व कॉलेज ऑफ इंजिनिअरिंगचे प्राचार्य डॉ.बी.पी. रोंगे यांच्या मार्गदर्शनाखाली, उपप्राचार्य डॉ. मिनाक्षी पवार यांच्या नेतृत्वाखाली व प्रा. स्मिता गावडे यांच्या सहकार्याने पार पडले. या प्रशिक्षणामुळे इलेक्टीकल वाहनां संदर्भात विद्यार्थ्यांच्या माहितीत मोलाची भर पडली, हे मात्र नक्की!

# १६ ऑगस्टपर्यंत १ लाख ७४ हजार महिलांच्या अर्जांना मान्यता

**दैनिक यश सिद्धी न्यूज**

धाराशिव/सुधाकर रणदिवे, मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण ही महत्त्वाकांक्षी योजना आहे. या योजनेसाठी पात्र




असलेली कोणतीही महिला योजनेच्या लाभापासून वंचित राहू नये यासाठी जिल्हा प्रशासन विविध यंत्रणांच्या माध्यमातून काम करीत आहे. योजनेसाठी पात्र ठरलेल्या महिलेला दर महिन्याला १५०० रुपये त्यांच्या आधारसंलग्न बँक खात्यामध्ये जमा करणार आहे. स्वतंत्र्य दिनाच्या पूर्वसंध्येला म्हणजे १४ ऑगस्ट पासून पात्र मुलांच्या खात्यात जमा होण्यास सुरुवात झाली आहे. जिल्ह्यात जवळपास ३ लक्ष २४ हजारापेक्षा पात्र लाभार्थी महिलेचे अर्ज भरण्याची प्रक्रिया गतिमान झाली आहे. १६ ऑगस्ट पर्यंत जिल्ह्यातील १ लक्ष ७९ हजार ९११ महिलांनी या योजनेचा लाभ घेण्यासाठी ऑनलाईन अर्ज नारी शक्ती पवर केले आहे.१ लक्ष २८ हजार ८१७ अर्ज संकेतस्थळावर प्राप्त झाले आहेत. असे एकूण ३ लक्ष ८ हजार ७२८ अर्ज प्राप्त झाले आहेत. प्राप्त अर्जापैकी १ लक्ष ७४ हजार ३४१ महिलांच्या अर्जांना नारीशक्ती मान्यता दिली आहे.

# इंदापूर महाविद्यालयाचा अभिनव उपक्रम 'मला आय.ए.एस.व्हायचंय'

**✻ हर्षवर्धन पाटील वाढदिवसानिमित्त इंदापूर महाविद्यालयाच्या कनिष्ठ विभागाचा स्पर्धा परीक्षेचा उपक्रम ✻ विद्यार्थ्यांच्या स्पर्धा परीक्षेच्या तयारीकरिता असे उपक्रम महत्त्वपूर्ण - प्राचार्य डॉ. जीवन सरवदे**

**दैनिक यशसिद्धी न्युज**

इंदापूर/ अतुल सोनकांबळेः राष्ट्रीय सहकारी साखर कारखाना महासंघाचे अध्यक्ष, माजी मंत्री व संस्थेचे अध्यक्ष हर्षवर्धन पाटील यांच्या वाढदिवसानिमित्त इंदापूर येथील कला, विज्ञान



आणि वाणिज्य महाविद्यालयाच्या कनिष्ठ विभागाच्या स्पर्धा परीक्षा व पोलीस भरती मार्गदर्शन केंद्राच्या वतीने विद्यार्थ्यांच्या स्पर्धा परीक्षेच्या अनुषंगाने आयोजित 'मला आय.ए.एस. व्हायचंय 'या माध्यमातून स्पर्धा परीक्षेचे आयोजन करण्यात आले होते. ३०० पेक्षा जास्त विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला. कला शाखेवर आधारित, चालू घडामोडी, अंकगणित व बुद्धिमत्ता चाचणी, इतिहास, भूगोल, राज्यशास्त्र आणि अर्थशास्त्र, तसेच भाषा विषय या घटकावर भर देण्यात आला.

प्राचार्य डॉ. जीवन सरवदे म्हणाले की,'महाविद्यालयाच्या कनिष्ठ विभागाचा हा अनोखा व अतिशय सुंदर असा उपक्रम आहे. विद्यार्थ्यांना स्पर्धा परीक्षा संदर्भातील उजळणी तसेच त्याविषयीची सर्वांगीण माहिती उपलब्ध होण्यासाठी असे उपक्रम विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक करिअरसाठी महत्त्वपूर्ण ठरतात.' उपप्राचार्य प्रा. दत्तात्रय गोळे म्हणाले की,' विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाकरिता कनिष्ठ महाविद्यालयाच्या वतीने विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात येते.संस्थेचे अध्यक्ष माजी मंत्री हर्षवर्धन पाटील यांचा वाढदिवस महाविद्यालयात अनेक उपक्रमाद्वारे साजरा करण्यात येतो.' डॉ. शिवाजी वीर यांनी आपले मनोगत व्यक्त केले.यावेळी डॉ. भिमाजी भोर, प्रा.कल्पना भोसले,प्रा.सुनील सावंत उपस्थित होते.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. रोहिदास भांगे यांनी केले.कार्यक्रमाचे आभार स्पर्धा परीक्षा समन्वयक प्रा. राजीव शिरसट यांनी मानले.

# वंचित बहुजन आघाडी सोलापूर शहर जिल्हा आयोजित समस्त ओबीसी संघटना प्रमुखांची बैठक संपन्न

**दैनिक यशसिद्धी न्युज**

सोलापूर/प्रतिनिधीः वंचित बहुजन आघाडी सोलापूर शहर जिल्ह्याच्या वतीने सोलापूर शहर जिल्ह्यातील ओबीसी समाज संघटनाच्या प्रमुखलोकांची बैठक समाज कल्याण केंद्र रंगभवन सोलापूर

..या ठिकाणी पार पडली,, यावेळी अनेक ओबीसी नेत्यांचे मनोगत या ठिकाणी व्यक्त करण्यात आले आणि आदरणीय बाळासाहेब आंबेडकर यांच्या सूचनेनुसार आवाहनानुसार १०० आमदार विधानसभेवर पाठवण्याचा निश्र्चय याठिकाणी करण्यात आला ,,ओबीसीचा मत ओबीसीलाच,,, ओबीसीचा मत एससी एसटी,,, एससी एसटी चा मत ओबीसीला,,, अशा प्रकारची घोषणा देऊन आगामी काळात होणाऱ्या विधानसभेला सर्व संघटना वंचित बरोबर युती करून निवडणुकीला सामोरे जाण्याची दृढनिश्र्चय या ठिकाणी करण्यात आला. गेल्या ४० वर्षापासून ओबीसी बांधवांना एकत्र करण्याचा प्रयत्न आदरणीय बाळासाहेब आंबेडकर हे करीत आहेत मंडल आयोग लागू करण्याचा महत्त्वाची भूमिका आदरणीय बाळासाहेब आंबेडकर यांची होती



अशा प्रकारचे मनोगत उपस्थित ओबीसी प्रमुखांच्या वतीने करण्यात आला,,, यावेळीधनगर समाज संघटनेचे उमेश काळे भीमाशंकर खांडेकर डीडी पांढरे ओबीसी समाज महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष डॉक्टर माधुरीताई पारपल्लीवार ओबीसी समाज हक्क परिषदेचे अध्यक्ष माधुरी ताई पोतदार उद्धव सिंह कयवाले लोधी समाज संघटना सागर धनी वाले अजय काया वाले करण बोके वाले आकाश शाहीर जयसिंग कलावाले वडार समाज संघटनेचे विशाल पाथरूट भारती पाथरूट ओबीसी संघटनेचे महादेव माने प्रकाश कटारे चंद्रमुळी तमनुर सुरत धोत्रे तोपा चव्हाण प्रवीण शिंगाडे राजेश रंधिरे धर्मांना गावडे महासिंहप्पा बिराजदार बंजारा समाजाचे भोजराज पवार लेबर पार्टी ऑफ इंडियाचे बशीर अहमद शेख चंद्रशेखर बदलापुरे आकाश तीरेकर श्रीकांत घोडके डॉक्टर झाकीर शेख अमित राठोड नवनाथ साळवे. आदि उपस्थित होते सदर कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी जिल्हाध्यक्ष चंद्रशेखर मडीखांबे शहराध्यक्ष प्रशांत गोणेवार विक्रांत गायकवाड विनोद इंगळे विजयानंद उघडे रवी पोटे साहिल कांबळे शिवाजी आप्पा बनसोडे शंकर शिंदे जालिंदर चंदनशिवे अमर डूरके विजय गायकवाड महिला आघाडीच्या अध्यक्षा श्र्वेता ताई राजगुरू संगीता साबळे पुष्पाताई गायकवाड निशाताई बेले आदींनी परिश्रम घेतले..

# श्री छत्रपती शिवाजी महाविद्यालयात एसी आणि रेफ्रिजरेंशन लॅब चे उद्घाटन

**दैनिक यश सिद्धी न्यूज**

उमरगा : भारत शिक्षण संस्थेच्या श्री छत्रपती शिवाजी महाविद्यालयात एसी आणि रेफ्रिजरेशन लॅब आयसीआयसीआय फाउंडेशन च्या सौजन्याने सुरू करण्यात आली. या लॅब चे उद्घाटन भारत संस्थेचे अध्यक्ष अमोल शिवाजीराव मोरे, सचिव पद्मकराराव हराळकर, सहसचिव डॉ सुभाष वाघमोडे, संचालक सुनील माने, अशोक पाटील यांच्या शुभ हस्ते संपन्न झाले. एसी आणि रेफ्रिजरेशन अभियांत्रिकी सेवांमध्ये बेसिक डिप्लोमा आणि डवांन्स अभ्यासक्रम पूर्ण केल्यास ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना व्यावसायिक आणि रोजगारभिमुख तांत्रिक शिक्षण घेऊन नोकरी किंवा स्वयरोजगार करता येतो असे प्रतिपादन प्राचार्य डॉ संजय अस्वले यांनी केले आहे. यावेळी माजी प्राचार्य डॉ एन डी शिंदे,





डॉ डी एस बिराजदार , उपप्राचार्य डॉ विलास. इंगळे, डॉ पी ए पिटले आयसीआयसीआय फाउंडेशन चे समन्वयक निलेश राऊत आणि प्राध्यापक मोठ्या संख्येने उपस्थित होते. या कोर्स मुळे विद्यार्थ्याना AC सेवा तंत्रज्ञ मॅन्युफॅक्चरिंग कंपन्यांमध्ये रेफ्रिजरेटर्स आणि एअर कंडिशनर्सची असेंब्ली आणि चाचणी, सेंट्रलाइज्ड एसी प्लांटची स्थापना आणि देखभाल, कोल्ड स्टोरेज आणि इतर कंपन्यांमध्ये रेफ्रिजरेटर्स, एअर कंडिशनर, वॉटर कूलर इत्यादींची दुरुस्ती आणि प्रतिबंधात्मक देखभाल. रेफ्रिजरेटर, एअर कंडिशनर, वॉटर कुलरची विक्री,उत्पादक कंपन्यांमध्ये विद्युत देखभाल आदी करिअरच्या संधी उपलब्ध आहेत. तरी विद्यार्थ्यानी आणि बेरोजगार युवकांनी या संधीचा लाभ अग्याव असेही आवाहन प्राचार्य डॉ अस्वले यांनी केले आहे .

# पाऊस पडावे म्हणून सुपतगाव येथील भजनी मंडळाकडून ११ मारुतीला जलाभिषेक



**दैनिक यश सिद्धी न्यूज**

उमरगा/प्रतिनिधी :सुपतगाव येथील हनुमान भजनी मंडळातील वारकऱ्यांनी गावाच्या परिसरातील अकरा मारुतींना पाणी घालण्यासाठी पायी दिंडी काढलेली आहे,

निसर्ग साथ देत नसल्यामुळें ऑगस्ट महिना संपत आला तरी अजून पाऊस येत नसल्यामुळे सुपतगाव येथील भजनी मंडळाने कोराळ,नळवाडी, येणेगुर भोसगा ,जेवळी ,पांढरी, हिपरगा तोरंबा ,करवंजी , हराळी या सर्व परिसरातील मारुती मंदिरामध्ये पायी जाऊन भजन करत पाणी घालत आहेत, त्यांची श्रद्धा आहे की ११मारुतींना पाणी घातल्यानंतर आपल्या गावामध्ये पाऊस येतो असे या भजनी मंडळाचे म्हणणे आहे. सर्व शेतकरी आपली पेरणी करून आता पीक भरायला आले आहे तरी पाऊस कधी येईल याच्या प्रतीक्षेत आहेत. पाऊस पडत नसल्यामुळे शेतकरी चिंताग्रस्त झाला आहे, त्यामुळे सुपतगाव येथील भजनी मंडळांनी ११ मारुतींना पाणी घालण्यासाठी निघालेले आहेत. भजनी मंडळ शनिवारी रात्री बारा वाजता सुपतगाव येथून निघालेले आहेत, ज्ञानोबा माऊली तुकाराम, श्री राम जय राम जय जय राम जयघोषित वारकरी भजन करत परिसरातील अकरा मारुतींना पाणी घालण्यासाठी जात आहेत. या भजनी मंडळामध्ये ह भ प शिवहार मुळे महाराज,चंद्रकांत हेंडले , राजेंद्र करके , बाबासाहेब मुळे, प्रकाश जगदाळे,प्रभाकर मातोळे,सिद्धेश्र्वर करके ,भीमा करके भीमाशंकर झुरळे, युवराज पाटील, शिवलिंग बिराजदार,महादेव बिराजदार, सातलिंग लामजने, तानाजी पांचाळ,चंद्रकांत बिराजदार आदी भजनी मंडळ या सोहळ्यासाठी सहभागी झाले आहेत.

# टाकळीवाडी येथील श्री गणेश मूर्ती कर्नाटकातील निपाणी तालुका, चिक्कोडी तसेच महाराष्ट्रातील शिरोळ तालुक्यात प्रसिद्ध

टाकळीवाडी/ नामदेव निर्मळेः टाकळीवाडी तालुका शिरोळ येथे कुंभार समाज मोठ्या प्रमाणात आहे. त्यांचा पारंपारिक व्यवसाय गणेश मूर्ती बनवणे तसेच वीट तयार करणे खेळणी बनवणे त्यांचा पारंपरिक व्यवसाय पिढ्यान पिढ्या चालत आलेला आहे. लहान बालकापासून ते वयोवृद्ध कुंभार बांधव गणेश मूर्ती बनवण्याचे काम करत असतात. २/३ महिने अगोदर पासून सुरुवात होते. येथे अनेक आकर्षक वेगवेगळ्या रूपातील गणेश मूर्ती मिळत असून येथे ६ इंचा पासून ते ११ फुटापर्यंत गणेश मूर्ती बनवण्याचे काम चालू असते. विविध रूपातील गणेश मूर्ती आकर्षक ठरत आहेत. अनेक देव देवतांच्या रूपातील लहान मूर्ती पासून ते मोठ्या मूर्तीपर्यंत बनवण्याच काम चालू असते .विविध मंडळांनी अनेक आकर्षक मूर्ती आकर्षक ठरत आहेत. गणेशाचे आगमन थोड्या दिवसात होणार असून कुंभार समाज मूर्तीला रंगकाम करण्याचे काम जोरात सुरू आहे. गणेश मूर्ती पाहण्यासाठी अनेक बाल बच्चे व नागरिकांची झुंबड उडलेली आहे. गणेश मूर्तीची मागणी वाढत आहे.



# भगतसिंह, संगोळी रायन्ना व डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांची अर्ध पुतळाची अनावरण करून स्वातंत्र्य दिन साजरा

**दैनिक यशसिद्धी न्युज**

अक्कलकोट/प्रतिनिधीः बोलो भारत माता की जय! वंदे मातरम! राष्ट्रीय संत हवा मल्लिनाथ महाराज की जय चा जयघोष करीत भारत माता देवस्थान येथे थोर क्रांतिकारी देशभक्त भगतसिंह, संगोळी रायन्ना व डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांची अर्ध पुतळाची अनावरण करून शंभर फूट उंच खांबावर तिरंगा राष्ट्रध्वज मोठ्या जल्लोषात फडकावण्यात आला.

आळंद तालुक्यातील लाड चिंचोली ढोगी बना येथील जय भारत माता देवस्थान येथे १५ ऑगस्ट स्वातंत्र्यदिन आणि क्रांतिवीर सांगोली रायणाचा जयंती उत्सव कार्यक्रम मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आला. कर्नाटकातील आळंद तालुक्यातील लाडा चिंचोली तांडा ढोगि बना येथील जय भारत माता मंदिरात देशवासीयांकडून थोर क्रांतिकारी देशभक्त भगतसिंह, संगोळी रायन्ना व डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांची अर्ध पुतळाची अनावरण करण्यात आला.यानंतर विशेष पूजा करण्यात आला. जय भारत माता सेवा समिती नवी दिल्लीचे संस्थापक अध्यक्ष तथा राष्ट्रीय संत परमपूज्य श्री हवा मल्लिनाथ महाराज यांच्या दिव्य सानिध्यात सकाळी ८ वाजता कर्नाटक मुख्यमंत्रीचे सल्लागार तथा आळंद चे आमदार बी.आर.पाटील यांच्या हस्ते १०० फूट उंच राष्ट्रध्वज खांबावर तिरंगा ध्वज फडकावण्यात आला. या कार्यक्रमात विद्यमान व माजी लोकप्रतिनिधी, मान्यवर, सैनिक मोठ्या संख्येने सहभागी झाला होता दिवसभर देशभक्तीपर कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आला होता. देशभक्तीपर कार्यक्रमात देशभक्तांनी मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. समितीचे प्रवक्ते ड. वैजनाथ झळकी यांनी स्वागत केले.जय भारत माता सेवा समितीचे लातूर जिल्हा अध्यक्ष बालाजी बिराजदार यानी सूत्रसंचलन केले.



जय भारत माता देवस्थान यात्रा : महोत्सानिमित्त आलेला देशातील लाखों देशभक्तांनी भारत मातेची व राष्ट्रीय संत परमपूज्य श्री हवा मल्लिनाथ महाराज यांचा दर्शन घेवून खीर, पुरण पोळी,चपाती,कडक भाकरी, गरगट्ट भाजी असे विविध पदार्थ युक्त दक्षिण भारत पद्धतीने बनविलेला महाप्रसाद चा आस्वाद घेऊन जल्लोष साजरा केला.

**जय भारत माता सेवा समिती (रजी) नवी दिल्ली तर्फे १५ ऑगस्ट रोजी ७८ व्या स्वातंत्र्य दिनानिमित्त आणि क्रांतीवीर सांगोली रायणा यांच्या जयंतीनिमित्त आळंद शहरात भव्य तिरंगा रॅली मिरवणुक काढण्यात आला. जय भारत माता मंदिराच्या आवारात स्वातंत्र्य सैनिक भगतसिंग, संविधानाचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर व क्रांतिविर संगोली रायणा यांच्या प्रतिमेला लाखो देशभक्त कडून पुष्पहार अर्पण करून भारत मातेचा जयकार करीत जल्लोष साजरा केला.**

## तुमच्या मागण्या उपमुख्यमंत्र्यांपर्यंत पोहोचतील; धैर्यशील कदम ह्यांचे पत्रकार संवाद यात्रेला ठोस आश्वासन

**दैनिक यशसिद्धी न्युज**

उंब्रज/प्रतिनिधी : ग्रामीण महाराष्ट्रातील पत्रकारांच्या सर्व मागण्या रास्त आहेत. त्या मी उपमुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस ह्यांच्यापर्यंत नक्की पोहोचविन. भारतीय जनता पक्षाचे प्रदेश सरचिटणीस धैर्यशील कदम ह्यांनी शनिवारी (दि. १७) उंब्रज येथील पत्रकार संवाद कार्यक्रमात हे ठोस आश्वासन दिले.पत्रकार संवाद यात्रेतर्फे उंब्रज येथे 'पत्रकार संवाद' कार्यक्रम झाला. त्यात बोलताना श्री. कदम म्हणाले की, उभे आयुष्य पत्रकारितेमध्ये घालविणाऱ्या ग्रामीण पत्रकारांना आर्थिक स्थैर्य किंवा सुरक्षितता मिळत नाही. त्यांनी केलेल्या कामाबद्दल केवळ



शाब्दिक कौतुक करून त्यांचे पोट भरत नाही. म्हणूनच त्यांना सरकारकडून योजनांद्वारे आधार मिळाला पाहिजे.

प्रदेशाध्यक्ष वसंत मुंडे ह्यांचे कौतुक करताना श्री. कदम म्हणाले की, पत्रकार संवाद यात्रेच्या माध्यमातून त्यांनी पत्रकारांच्या मागण्यांना वाचा फोडली आहे. ह्या यात्रेला १०० टक्के यश मिळणार. पत्रकार संघाचे प्रदेशाध्यक्ष वसंत मुंडे ह्यांनी संवाद यात्रेची वाटचाल व राज्य सरचिटणीस डॉ. विश्वासराव आरोटे ह्यांनी समारोपाच्या कार्यक्रमाबद्दल माहिती दिली. कार्यक्रमास संघटनेचे सातारा जिल्हाध्यक्ष प्रवीण कांबळे, आरोग्य सेलचे प्रमुख डॉ. अमित खाडे, महेशकुमार जाधव, सहायक पोलीस निरीक्षक रवींद्र भोरे, कमलाकर पाटील, विशाल भोसले, विलासराव आटोळे, वैशाली मांढरे आदी उपस्थित होते.

## गोगांव ग्रामपंचायत व जिल्हा परिषद शाळेत स्वातंत्र्य दिन साजरा

### डॉ.बाबासाहेब आंबेडकर जयंती उत्सव समिती व महाराष्ट्र राज्य पत्रकार संघच्या वतीने खाऊ वाटप

**दैनिक यशसिद्धी न्युज**

अक्कलकोट/प्रतिनीधीः ७८व्या स्वातंत्र्य दिनानिमित्त गोगांव येथील ग्रामपंचायत कार्यालयाला समोर आयोजित कार्यक्रमाचे अध्यक्ष ग्रामपंचायत सदस्य लक्ष्मण बिराजदार हे होते प्रतिमा पूजन सदस्या ललिता कलशेट्टी, आरोग्य सेविका अंबिका वळसंग यांच्या हस्ते डॉ बाबासाहेब आंबेडकर व महात्मा गांधी यांचे प्रतिमा पूजन करण्यात आले ध्वज कट्टा पुजा माजी सैनिक बाबुलाल नदाफ यांनी केले ध्वजारोहण सरपंच वनिता सुरवसे यांच्या हस्ते करण्यात आले यावेळी उपसरपंच कमलाकर सोनकांबळे जेष्ठ सदस्य प्रदीप जगताप, डॉ लिंगराज नडगेरी, पोलीस पाटील चंद्रकला गायकवाड, सूर्यकांत जीरगे,यासह अनेक मान्यवर उपस्थित होते यावेळी अंगणवाडी





मुला मुलींना कपडे वाटप करण्यात आले

जिल्हा परिषद शाळेत सरपंच वनिता सुरवसे यांच्या अध्यक्षतेखाली कार्यक्रम घेण्यात आले प्रतिमा पूजन कल्याणराव बिराजदार यांनी महात्मा गांधी प्रतिमा पूजन करण्यात आले ध्वजारोहण जेष्ठ सदस्य प्रदीप जगताप यांच्या हस्ते करण्यात आले यावेळी उपसरपंच कमलाकर सोनकांबळे, ललिता कलशेट्टी मुख्याध्यापक दयानंद चोळे, अंगणवाडी सेविका भाग्यश्री सोनकवडे, तेजाबाई गुरव उपस्थित होते

यावेळी शालेय विद्यार्थीचे भाषण झाले शाळेच्या विविध उपक्रमांचे माहिती शंकर कारभारी यांनी सांगितले डॉ बाबासाहेब आंबेडकर जयंती उत्सव समिती गोगांव व महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ मुंबई शाखा अक्कलकोट यांच्या वतीने मुलांना खाऊ वाटप करण्यात आले यावेळी शालेय व्यवस्थापन समिती अध्यक्ष सुधीर जगताप, आशा सेविका मधुमती गायकवाड महादेव चव्हाण , पुंडलिक वाघमारे, ज्योती आलूरे, यासह अनेक मान्यवर उपस्थित होते

पान १ वरुन

### ..तर दीड हजारांचे तीन

सगळ्यांना पुरुन उरलो आहोत. एवढंच नाही तर सावत्र आणि कपटी भावांवर मात करुन इथपर्यंत आलो आहे. त्यामुळे सावत्र भावांची काळजी तुम्ही करु नका, त्यांना फक्त लक्षात ठेवा आणि योग्यवेळी त्यांना योग्य जागा दाखवा. सावत्र भाऊ खोटे आरोप करत आहेत, ही योजना फसवी आहे, हा निवडणुकीचा जुमला आहे. मग त्यांच्यातील कोणी म्हणत की, ही काय लाच देता का? असं काहीही बोलायला लागले आहेत. मात्र, आमच्या बहिणींबाबत असं बोलायला त्यांना थोडंतरी काही वाटायला पाहिजे. या योजनेत खोडा घालण्याचं काम विरोधकांनी केलं. त्यांना योग्यवेळी जोडा नक्की दाखवा. शेवटी मी एकच सांगतो की, एकवेळी आमच्यावर टीका केली तर आम्ही सहन करू. पण आमच्या बहिणींच्या विकासाच्या आडवं कोणी आलं तर मग गाठ माझ्याशी आहे, हे लक्षात ठेवा, असा इशारा मुख्यमंत्री शिंदे यांनी विरोधकांना दिला.

### सोलापुरात मघा नक्षत्राच्या सरी..

विशेषतः सोयाबीन आणि उडीद लागवड प्रत्येकी दीड लाख हेक्टरच्या घरात असून, ही पिके चांगल्या पद्धतीने वाढत आहेत. मका, तूर, बाजरी आदी इतर पिकांची स्थितीही चांगली असल्याचे दिसून येते.गेल्या जूनमध्ये एकूण सरासरी १६ दिवसांत २२८.२ (२२२.६ टक्के) पाऊस झाला होता, तर मागील जुलैमध्ये सरासरी १३ दिवसांत १२३.८ (१३०.६ टक्के) एवढा पाऊस झाला होता. चालू ऑगस्टमध्ये सरासरी ५ दिवस ४७.९ मिलिमीटर पाऊस पडला आहे.

### केंद्र सरकारकडून समितीची घोषणा..

शिकाऊ डॉक्टर आंदोलन करत आहेत. या घटनेच्या निषेधार्थ डॉक्टरांनी शनिवारी देशव्यापी २४ तास संप पुकारला असून त्यामुळे देशभरातील रुग्णसेवा विस्कळीत झाली.दरम्यान, आपण आरोग्य मंत्रालयाचे निवेदन तपासून पाहत आहोत असे 'आयएमए'कडून सांगण्यात आले. त्याच्या सर्व पैलूंवर काळजीपूर्वक विचार करून आमी सर्व राज्य शाखांशी सल्लामसलत करूनच प्रतिसाद देऊ असे त्यांनी सांगितले.

### जगातील प्रत्येक चौथा

असे सीतारामण म्हणाल्या. आपण जास्तीत जास्त आर्थिक संधी उपलब्ध करून देऊ शकतो. जनतेला डोळ्यासमोर ठेवून आपली धोरणे आखावी लागतील. विकासाच्या प्रवासात त्यांचा समावेश करावा लागेल असे सीतारामण म्हणाल्या. विकास बँकांनाही आपली जबाबदारी वाढवावी लागेल, असे अर्थमंत्र्यांनी सांगितले. विकसनशील देशांच्या आर्थिक गरजा पूर्ण करण्यात या बँका महत्त्वाची भूमिका बजावतात. देशात आर्थिक सुधारणा राबवून या बँकांकडून जास्तीत जास्त मदत मिळू शकते. याशिवाय, आपल्याला पैसे उभारण्याचे इतर मार्ग देखील शोधावे लागतील. कमी उत्पन्न असलेल्या देशांना आमचे प्राधान्य असले पाहिजे. मात्र, मध्यम उत्पन्न असलेले देश देखील पर्यावरणीय बदलांशी झुंजत आहेत. अशा परिस्थितीत त्यांनाही मदत केली पाहिजे. याशिवाय खासगी क्षेत्रालाही पुढे यावे लागेल असे सीतारामण म्हणाल्या.

### विठ्ठलभक्तांसाठी मोठी खुशखबर!

उच्चाधिकार समितीने ११० कोटी रुपयांचा आराखडा मंजूर केला आहे. आता पुढील महिन्यात मुख्यमंत्री यांच्या अध्यक्षतेखालील राज्य शिखर समितीच्या बैठकीत हा आराखडा अंतिम होऊन शासन निर्णय निघेल.

दर्शन रांगेत भाविकांसाठी पिण्याचे पाणी, शौचालयाची सुविधा, वेटिंग हॉल, दर्शनासाठी टोकन घेण्याची सुविधा, रिफ्रेशमेंट, आपत्तीमध्ये बाहेर पडण्याची व्यवस्था, हिरकणी कक्ष, दिव्यांगासाठी सुविधा, अग्नि विरोधक सुविधा, पोलीस, जेवणाची व्यवस्था, पार्किंगची सुविधा या बाबींचा समावेश आराखड्यात करण्यात आलेला आहे.

टोकण दर्शन व्यवस्थेनंतर आता भाविकांना केवळ दोन तासात पदस्पर्श दर्शन घेता येणार आहे. गोपाळपूर रोडवरील पत्रास शेड या ठिकाणी दर्शन मंडप उभारुन टोकण व्यवस्था केली जाणार आहे. सध्या दर्शनासाठी भाविकांना १७ ते १८ तास लागतात. टोकन दर्शनाची व्यवस्था सुरु झाल्यानंतर २ तासांमध्ये लाडक्या विठुरायाचे पदस्पर्श दर्शन मिळणार आहे. यामुळे भाविकांना मोठा दिला मिळणार असल्याचं बोललं जातंय.

### मुख्यमंत्रीपदाचा चेहरा जाहीर

विधानसभेची निवडणूक जिंकावीच लागेल. या शब्दात उद्धव यांनी 'मविआ' नेत्यांना कानपिचक्या दिल्या. केंद्र सरकार टेकूवर असल्याने मोदी आता धर्मनिरपेक्ष शब्द वापरायला लागलेत, तुम्ही हिंदुत्व सोडले असे आम्ही म्हणू काय', अशी विचारणा त्यांनी केली.बौद्ध आणि मुस्लीम मतदारांचा उद्धव यांनी विशेष उल्लेख केला. 'वक्फ'बरोबरच धार्मिक जमिनी उद्योगपतींना देण्यास विरोध असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. अयोध्येतील जमिनी व केदारेश्वराचे सोने कोणाच्या घशात गेले, याप्रश्नी लोकसभेची संसदीय चिकित्सा समिती नेमा, असे आव्हान त्यांनी भाजपला दिले.

## भिम आर्मी ची नुतन कार्यकारिणी जाहीर



**दैनिक यशसिद्धी न्युज**

औसा/ अमर जाधवः १०//०८/२०२४ या रोजी समाधान कांबळे यांच्या नेतृत्वाखाली औसा तालुका या ठिकाणी भिम आर्मी संघटनेतील पदाधिकाऱ्यांसोबत बैठक संपन्न झाली या वेळी औसा तालुका अध्यक्ष पदावर कार्यरत असलेले समाधान कांबळे यांना जिल्हा संघटक या पदावर बढती देऊन नुतन कार्यकारिणी जाहीर करण्यात आली यावेळी नुतन औसा तालुका अध्यक्ष पदी सिध्दार्थ कांबळे तालुका उपाध्यक्ष बिभिषण सरवदे औसा शहर अध्यक्ष मारूती कांबळे तालुका संघटक संदेश मांजरे तालुका प्रसिध्दी प्रमुख बाबासाहेब गरड पदी निवड करण्यात आली गाव तिथं शाखा काढण्यासंदर्भात चर्चा झाली लवकरच औसा तालुक्यात भव्य कार्यकर्ता मेळावा आयोजित करणार असल्याचे नुतन तालुका अध्यक्ष सिध्दार्थ कांबळे यांनी सांगितले यावेळी भिम आर्मी चे माजी महाराष्ट्र प्रदेश संघटक अक्षय धावारे मराठवाडा अध्यक्ष विनोद कोल्हे जिल्हा कार्याध्यक्ष बबलू गवळे लातूर तालुका अध्यक्ष बप्पा घनगावकर आदी पदाधिकारी उपस्थित...

## मराठा मंदिर श्री शहाजी प्रशालेत पाककला स्पर्धेचे वंदनाताई गावडेच्या हस्ते उद्घाटन

### मराठा मंदिर चिटणीस राजेंद्र गावडे यांच्या कडुन विद्यार्थीचे कौतुक

**दैनिक यशसिद्धी न्युज**

अक्कलकोट/प्रतिनिधी: लहान वयातच पालकांच्या मदतीने मुलांनी बनवलेले खाद्यपदार्थ पौष्टिक व रूचकर आहेत. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांच्या कलागुणांना या विविध स्पर्धेच्या माध्यमातून मराठा मंदिराच्या शाळेत संधी मिळत आहे हे कौतुकास्पद आहे असे प्रतिपादन मराठा मंदिरचे सदस्य वंदनाताई गावडे यांनी केले. येथील मराठा मंदिर श्री शहाजी प्रशालेमध्ये शनिवारी सकाळी आनंददायी शिक्षण उपक्रमातंर्गत प्रशालेचे मुख्याध्यापक एस.एन.शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली राष्ट्रीय हरित सेना, स्काऊट -गर्ल गाईड तसेच, विज्ञान विषय व समाजशास्त्र विषय क्षेत्रभेट, वनभोजन निमित्ताने विद्यार्थी विद्यार्थीनीसाठी पाककला स्पर्धेचे आयोजन केले होते. त्याचे उद्घाटन करताना



प्रमुख पाहुणे म्हणून ते बोलत होते. याप्रसंगी मराठा मंदिर चिटणीस राजेंद्र गावडे, वंदनाताई गावडे, सोनम निशानदार, विहान निशानदार, उपमुख्याध्यापक एस.व्ही.भांगरे, पर्यवेक्षक आर.एस.पडवळकर आदींची प्रमुख उपस्थिती होती. प्रारंभी मान्यवरांना एन सी सी व बॅन्ड पथकाच्या वतीने मानवंदना देण्यात आली. प्रशालेच्या वतीने उपस्थित मान्यवरांचा सत्कार करण्यात आला. पौष्टिकता, सादरीकरण व चव व नावीन्यता या आधारावर परीक्षकांनी पहिले तीन क्रमांक काढले.सुत्रसंचालन वाय.पी.कबाडे यांनी केले तर आभार अरविंद शिंदे यांनी मानले. यावेळी प्रशालेतील सर्व विद्यार्थी, शिक्षकवृंद, शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित होते.